महात्मा गांधीजींच्या १५३व्या जयंतीनिमित्त त्यांच्या मार्गावरून जाणाऱ्या लोकांच्या गोष्टी या पुस्तकात एकत्रित केल्या आहेत. फारशा जगापुढे न आलेले हे लोक समाजात बदल घडवून आणण्याच्या ध्येय्याने झपाटलेले आहेत.

'खरा भारत खेड्यात आहे आणि जर गरिबांची सेवा करायची असेल, तर खेड्यात जाऊन काम करायला हव', हा महात्मा गांधीजींचा आदेश शिरोधार्य मानून त्यांनी त्यांच्या आयुष्याची दिशा ठरवली. बापूंचा आदर्शवाद प्रत्यक्ष जीवनात अंगीकारून आयुष्य समृद्ध होतं आणि समाजालाही त्याचा फायदा होतो हे या लोकांनी त्यांच्या जगण्यातून सिद्ध केलंय.

या पुस्तकात ज्या लोकांच्या गोष्टी आहेत ते लोक प्रकाशझोतात नाहीत. सत्याग्रह आणि अहिंसा या गांधीजींच्या शस्त्रांचा वापर करून ते कार्यरत आहेत. आजही या दोन गोष्टी तुम्हाला दीनदुबळ्या लोकांच्या आयुष्यात बदल घडवून आणण्यासाठी प्रभावी आहेत, हे त्यांच्या कार्याशैलीतून दिसून येतं. यातल्या बऱ्याच जणांना पुरस्कार मिळालेत; पण तरीही त्यांच्या गोष्टी सर्वसामान्य लोकांपर्यंत फारशा पोहोचलेल्या नाहीत. *बिइंग द चेंज* हे पुस्तक त्या गोष्टी तुमच्यापर्यंत पोहोचवण्याचं काम करू इच्छित आहे.



ISBN : 978-93-91629-91-5
₹ 250
मधुश्री पब्लिकेशन
www.madhushreepublication.com

# प्रशंसा

गांधीजींची तत्त्वे आत्मसात करून त्या तत्त्वांना आपल्या कृतीतून जिवंत ठेवणाऱ्या लोकांच्या प्रेरणादायी गोष्टी.

**– श्री.धनंजय चंद्रचूड**

भारताचे मुख्य न्यायाधीश

समाजाच्या तळागाळात अद्भुत बदल घडवून आणणाऱ्या लोकांच्या गोष्टी. तरुणांनी जरूर वाचावं असं हे पुस्तक आहे.

**– अमिताभ कांत**

जी–२० शेर्पा, एक्स.सीईओ. नीती आयोग

'स्व'च्या पलीकडे जाऊन केलेल्या कामाच्या विलक्षण परिणामकारक गोष्टी या पुस्तकात वाचायला मिळतात. त्यात असामान्य धैर्य आणि साहस आढळून येतं. एक अतिशय प्रेरणादायी पुस्तक.

**– नंदन निलेकणी**

चेअरमन आणि को–फाउंडर, इन्फोसीस.

फाऊंडिंग चेअरमन, युआयडीएआय.



**आशुतोष सलिल** हे महाराष्ट्र केडरचे आय.ए.एस. अधिकारी असून, सध्या ते नवी दिल्ली इथे भारत सरकारच्या सेवेत कार्यरत आहेत. त्यांनी बंगलोर इथल्या नॅशनल लॉ स्कूलमधून कायद्याचे शिक्षण पूर्ण केले आहे. हार्वर्ड लॉ स्कूलमधून त्यांनी मास्टर्सची पदवी मिळवली आहे. त्यांना फुलब्राईट शिष्यवृत्तीही मिळालेली आहे. महाराष्ट्रातील विदर्भ भागात काम करत असताना त्यांना निरपेक्ष वृत्तीने सामाजिक काम करणारे जे ध्येयवादी लोक भेटले, त्यांच्या गोष्टी या पुस्तकात आहेत.



**बरखा माथुर** या नागपूर येथील पत्रकार आहेत. त्या गेली तीन दशकं अत्यंत संवेदनशील वृत्तीने पत्रकारितेच्या माध्यमातून समाजमन टिपत आहेत. त्यांनी प्रमुख वृत्तपत्रात आणि इतर माध्यमात काम केले आहे. या क्षेत्रातील कामाबद्दल त्यांना विदर्भ साहित्य संघाने आणि नागपूरच्या जर्नालिस्ट असोसिएशन यांनी पुरस्कार दिले आहेत.

Cover Image **Coutesy of**
**The Collection of Sir J.J. School/Laila Joshi**

Cover Design **Saurav Das**

# आशिष आणि कविता सातव

## मेळघाटातल्या आदिवासींचे देवदूत!

एका रात्री आपल्या एकुलत्या एक मुलाच्या रडण्यानं डॉ. आशिष सातव आणि त्यांची पत्नी डॉ. कविता सातव दचकून उठले. त्यांचा मुलगा अथांग त्या वेळी तीन वर्षांचा होता. अथांग तब्येतीनं नाजूक होता. शिवाय त्याला अस्थम्याचाही त्रास होता. खूप कळवळून रडत होता. पण दोघांनाही त्याला नेमकं काय झालंय हे कळेना. त्या दोघांपैकी कोणीच बालरोगतज्ज्ञ नव्हतं. तिथं दुसरे कोणी डॉक्टर मिळण्याची काहीही शक्यता नव्हती. त्यांचं घर हॉस्पिटलपासून १५० किलोमीटरवर होतं. तिथं पोचायला दाट जंगलातून जावं लागत होतं.

ते दोघंही अथांगकडे हताश नजरेनं बघत होते, तेवढ्यात आशिष यांच्या लक्षात आलं की अथांगचा कान दुखतोय. मेळघाटासारख्या दुर्गम भागात ते कुपोषणग्रस्त आदिवासींची सेवा करायला स्थायिक झाले होते. तिथं ईएनटी तज्ज्ञ मिळणं आजही मुश्कील आहे. मग २००४ साली तर अशक्यच होतं. रात्रभर डॉ. आशिष यांनी बालरोगांवरचं पुस्तक वाचून औषधांची माहिती घेतली आणि स्वतःच अथांगवर उपचार केले. सकाळपर्यंत दुखणं थांबलं पण आशिष यांच्या लक्षात आलं, की अथांगच्या एका कानाच्या पडद्याला दुखापत झाली आहे, तो फाटलाय. अथांगला वर्ध्याला हॉस्पिटलमध्ये दाखल करावं लागेल. आशिष वर्ध्याचेच होते. वर्धा त्यांच्यापासून २५० किलोमीटर अंतरावर होतं. हॉस्पिटलमध्ये अथांगच्या शेजारी बसले असताना त्या दोघांनाही त्यांच्या असहायतेची जाणीव झाली. आईवडिलांपैकी एक जण एम.डी. आणि दुसरा एम.एस. असताना त्या दोघांनाही आपल्या बाळाच्या वेदनांकडे नुसतं बघत बसायला लागत होतं. जर वेदनेनं तळमळणाऱ्या आपल्याच मुलासाठी आपण काही करू शकत नाही, तर मग आपल्या शिक्षणाचा काय उपयोग, त्या दोघांच्याही मनात हा विचार आला. मेळघाटच्या दमट आणि थंड हवेमुळे त्यांच्या मुलाचा अस्थमा आणखी बळावत आहे हे त्यांच्या लक्षात आलं.

''ते क्षण खूप अवघड होते. कुठल्याही क्षणी आम्ही कमजोर झालो असतो. ते विचार आणखी थोडा वेळ मनात रेंगाळू दिले असते तर आम्ही मेळघाटला परत गेलोच नसतो.'' डॉ. कविता सांगत होत्या.

आशिष आणि कविता सातव कमजोर पडले नाहीत. ते मेळघाटला परत आले आणि त्यांनी स्वतःला परत पहिल्यासारखं कामाला जुंपलं. या घटनेनंतर सोळा वर्षांनी, ३ जानेवारी २०२० साली त्यांना राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या भेटीला बोलावलं गेलं. मेळघाटमधील आदिवासींना ते पुरवत असलेल्या आरोग्यसेवेचे अनुभव त्यांना राष्ट्रपतींना सांगण्याची संधी मिळाली.

आशिष यांना अनेक पुरस्कार मिळत गेले. जागतिक आरोग्य संघटनेचा पब्लिक हेल्थ चॅम्पियन पुरस्कार, यू. के. इथला सेव्ह द चाइल्ड पुरस्कार, बेस्ट ट्रायबल रीसर्च पुरस्कार आणि इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रीसर्चचा यंग सायंटिस्ट पुरस्कार, अशा अनेक पुरस्कारांचा त्यात समावेश आहे.

डॉ. आशिष सातव यांनी तेरा वर्षांचे असतानाच खेड्यात राहून काम करायचं ठरवलं होतं. त्यांना त्या वयात असं वाटलं हे विशेष होतं. त्याला अनेक कारणं होती. ते अतिशय दंगेखोर होते आणि बऱ्याच वेळा आपल्या भावंडांशी हाणामारी केल्यानं ते अडचणीत सापडत असत. हे झालं एक कारण.

सातव कुटुंब हे वर्ध्यातलं प्रतिष्ठित व्यावसायिक कुटुंब होतं. आशिष यांचे वडील ट्रॅक्टर्स आणि दुचाकीचे डिस्ट्रिब्युटर होते. त्यांच्या मालकीच्या शेतजमिनीही होत्या. त्यांच्या तीन मुलांपैकी आशिष हा त्यांचा दोन नंबरचा मुलगा खूप लाडावलेला होता. तो खूप दंगेखोर होता आणि बऱ्याचदा त्याच्या खुणा अंगावर दिसायच्या.

आशिष यांचे आजोबा वसंतराव बोंबाटकर हे गांधींचे अनुयायी होते. त्यांना जेव्हा आपल्या नातवाच्या खोडकर करामतींबद्दल कळलं तेव्हा त्यांनी त्याच्यातल्या ऊर्जेला योग्य वळण द्यायचं ठरवलं. बोंबाटकर स्वतः गांधीजींबरोबर स्वातंत्र्य चळवळीत लढले होते. विनोबा भावे आणि जयप्रकाश नारायण यांच्याबरोबरही त्यांनी काम केलं होतं. त्यांनी आशिषला या थोर लोकांबद्दल सांगून त्यांची ओळख करून दिली. आशिष सातवीत असताना त्यांनी त्याला गांधी विचारांवरची पुस्तकं दिली आणि गांधीजींच्या तत्त्वज्ञानावर आधारित गोष्टी सांगितल्या.

पौगंडावस्थेतील वयात असलेल्या आशिषवर या गोष्टींचा परिणाम झाला. तेराव्या वर्षी त्यांनी जेव्हा 'माझे सत्याचे प्रयोग' हे पुस्तक वाचलं, तेव्हा त्या पुस्तकाचा त्याच्या मनावर खोल परिणाम झाला. खरा भारत खेड्यात आहे आणि ज्याला देशाची सेवा करायची असेल त्यानं खेड्यात जावं हा गांधीजींचा विचार त्या तेरा वर्षांच्या मुलाला पटला. आपण मोठे झाल्यावर खेड्यात राहून काम करायचं असं त्यांनी ठरवलं.

नातवाच्या निश्चयानं बोंबाटकर खूप आनंदित झाले. त्यांनीही नंदुरबारच्या आदिवासी भागातल्या शेतकऱ्यांना शिकवण्याचं, त्यांना सक्षम करण्याचं काम केलं होतं. शेती करणाऱ्या त्या लोकांची दैन्यावस्था त्यांनी बघितली होती. गोरगरीब, गरजू लोकांची सेवा करणं हीच देशसेवा असल्याचं

त्यांना माहीत होतं. आशिषचे वडील, त्यांचे सासरे कशा प्रकारे आपल्या मुलावर संस्कार करत आहेत हे बघत होते. आपला मुलगा प्रवाहाच्या दिशेनं वाहवत जाणारा नसून तो वेगळाच, स्वतःचा असा मार्ग शोधेल हे रामभाऊंना माहीत होतं.

आशिष त्यांच्या वडिलांच्या आणि आजोबांच्या विश्वासाला पात्र ठरले. त्यांनी मेळघाटात आरोग्यसेवा नेली. भारतातल्या सर्वात प्रगतिशील राज्यातल्या सर्वात मागासलेल्या भागात आरोग्यसेवा नेऊन त्यांनी हजारो लोकांचे प्राण वाचवलेत.

नागपूरच्या मेडिकल कॉलेजमध्ये शिकत असतानाच डॉ. आशिष यांनी आपल्या कर्मभूमीचा शोध घ्यायला सुरुवात केली होती. १९९७ साली आपण एम.डी. पूर्ण करू तेव्हा कुठं राहून काम करायचं याचा विचार ते आधीच करू लागले होते. सुट्ट्यांमध्ये ते वर्ध्याला जात नसत. त्याऐवजी ते गडचिरोली भागात डॉ. प्रकाश आमटे आणि डॉ. अभय बंग यांनी उभ्या केलेल्या हॉस्पिटल्समध्ये जात असत. दाट जंगलांनी वेढलेल्या त्या परिसरात स्थानिक गरीब लोकांवर उपचार करण्यापासून त्यांच्या स्वप्नपूर्तीची सुरुवात झाली.

रामभाऊ आणि त्यांची पत्नी कमल या दोघांनाही अनेक शारीरिक व्याधी होत्या. आशिष एकटे त्यांच्या कुटुंबातले डॉक्टर होते. तरीही त्यांनी ''खेड्यात न जाता इथं राहून आमची काळजी घे'' असं त्यांना कधीही सांगितलं नाही.आशिषना त्यांच्या आईवडिलांची काळजी वाटायची. गडचिरोली वर्ध्याजवळ असल्यानं तिथं राहून काम करण्याचा विचारही त्यांच्या मनात येऊन गेला. त्यांच्या आईवडिलांना जेव्हा गरज लागेल तेव्हा त्यांच्याकडेही लक्ष देता येईल असा त्यांचा विचार होता. पण त्याचबरोबर त्यांच्या हेही लक्षात आलं, की डॉ. आमटे आणि डॉ. बंग हे दोन निष्णात डॉक्टर्स तिथं काम करत होते. तिथं आणखी एक हॉस्पिटल सुरू करायचं म्हणजे स्वतःची सोय बघण्यासारखं होतं, त्यात गरजूंची सोय बघितली जाणार नव्हती.

म्हणून मग डॉ. सातव यांनी मेळघाटमधील धारिणी हे गाव निश्चित केलं. अमरावती जिल्ह्यातल्या या गावात वाघ आणि कुपोषण या दोन गोष्टी आहेत. इथं खूप पाऊस पडतो आणि पावसाळ्यातले चार महिने इथलं वातावरण ढगाळ आणि धुक्यानं वेढलेलं असतं.

दोन हजार सालाच्या सुरुवातीला मुंबईपासून ६२२ किलोमीटर अंतरावर असणाऱ्या मेळघाटात अजिबात सोयी नव्हत्या. मागासलेला हा शब्द अपुरा वाटावा इतकी तिथली परिस्थिती वाईट होती. रस्ते धड नव्हते आणि वीजही नव्हती. धारिणी आणि अमरावती दरम्यानच्या त्या डोंगराळ, वळणावळणाच्या भागातील रस्त्यांवरून जेमतेम दोन बसेस धावायच्या. मुख्य वस्तीपासून धारिणी गाव १०० किलोमीटरवर होतं. तिथं पोचायला पक्का रस्ता नव्हता. दाट जंगलातून जावं लागायचं.

एकदा त्या भागात जाऊन राहायचं निश्चित झाल्यावर आशिषनं स्वतःला त्या दुर्गम भागात जाऊन राहण्यासाठी तयार करायला सुरुवात केली. विदर्भातल्या भयानक उन्हाळ्यातही कुलर किंवा फॅन लावणं बंद केलं. उन्हाळ्यात ४८ डिग्री तापमान व्हायचं, पण तो तीव्र उन्हाळा त्यांनी सहन करायची सवय लावली. कडाक्याच्या थंडीच्या दिवसांत मुद्दाम त्याची सवय व्हावी म्हणून थंड पाण्यानं अंघोळ करायला सुरुवात केली.

शारीरिक आणि मानसिक सामर्थ्य वाढवण्यासाठी आणि कुठल्याही संकटात मन स्थिर ठेवण्यासाठी त्यांनी रोज योगासनं आणि प्राणायाम करायला सुरुवात केली. सुट्ट्यांमध्ये मेळघाट किंवा गडचिरोली इथं जाऊन ते स्थानिक लोकांची जीवनपद्धती काय आहे याचा अभ्यास करू लागले. हळूहळू त्या कठीण भागात, हवेत राहण्याची तयारी होऊ लागली. आता फक्त दोन गोष्टींची त्यांना काळजी वाटत होती. एक म्हणजे तिथल्या आरोग्यसुविधांची दुरवस्था आणि तिथं राहणाऱ्या लोकांची दैन्यावस्था.

आशिष यांनी त्या भागात असलेल्या फक्त दोन आरोग्य केंद्रांची निवड केली. एक धारिणीला होतं आणि दुसरं तिथून ८५ किलोमीटर अंतरावर चिखलदरा इथं होतं. त्या दोन्ही केंद्रांत पोचायचं म्हणजे स्थानिक लोकांना दाट जंगलातून जावं लागायचं. त्या भागात आरोग्याच्या भरपूर समस्या

होत्या, मात्र त्यासाठी लागणाऱ्या उपचारांची सोय नव्हती. आशिष यांनी ही परिस्थिती सुधारण्याची शपथ घेतली.

१९९८ साली त्यांनी सेवाग्राम इथल्या 'महात्मा गांधी इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस'मधल्या अध्यापकाच्या नोकरीचा राजीनामा दिला आणि 'महान' नावाच्या संस्थेची नोंदणी केली. नोकरीतून आणि पोस्ट ग्रॅज्युएशन करताना वाचवलेल्या पैशांतून त्यांनी धारिणीला चार खोल्यांचं घर भाड्यानं घेतलं. त्या घराचं त्यांनी हॉस्पिटलमध्ये रूपांतर केलं. कोलुपूर या जवळच्या गावात एक मातीचं झोपडीवजा घर ओपीडीसाठी घेतलं. एम.डी. झालेले डॉ. आशिष सातव रुग्णांसाठी, दिवसाचे चोवीस तास उपलब्ध राहावं आणि त्यांना हवं तेव्हा भेटता यावं म्हणून हॉस्पिटलमध्ये राहू लागले. क्वचितप्रसंगी त्या रुग्णाची थुंकी किंवा त्यांनी केलेली उलटीची घाण पुसण्यापासून सगळं काही त्यांना करावं लागायचं.

ते बऱ्याचदा डॉ. रवींद्र कोल्हे यांनाही भेटायचे. धारिणीहून ३१ किलोमीटर अंतरावर डॉ. कोल्हे स्थायिक झाले होते. त्यांच्याकडून डॉ. आशिष आदिवासी लोक आणि त्यांच्या आरोग्य समस्या समजून घेण्यासाठी जात असत. डॉ. कोल्हे यांनी आशिष यांना मार्गदर्शन तर केलंच, पण त्याबरोबर त्यांच्या आयुष्याची जोडीदार शोधण्यासाठी ते कारणीभूत ठरले.

या आदर्शवादी तरुण डॉक्टरच्या भावी पत्नीबद्दल काही कल्पना होत्या. ती सरकारी मेडिकल कॉलेजमधून शिकलेली डॉक्टर मुलगीच हवी. वेगळ्या जातीची आणि मेळघाटला राहून गरिबांसाठी काम करण्याची तयारी असलेली अशी मुलगी त्यांना हवी होती.

एकदा डॉ. कोल्हेंच्या पत्नी डॉ. स्मिता यांचा चश्मा फुटला म्हणून नेत्रतज्ज्ञ डॉ. संध्या मानेकर यांना भेटण्यासाठी डॉ. आशिष स्मितातार्इंबरोबर अमरावतीला गेले. चेकअप झाल्यावर ते तिघं गप्पा मारू लागले. स्मितातार्इंनी उंच सडपातळ अंगकाठीच्या आशिष यांची संध्याला ओळख करून दिली. आम्ही याच्यासाठी स्थळ बघत आहोत, पण त्याला डॉक्टर मुलगी हवी असल्याचं त्यांनी संध्याला सांगितलं.

संध्या पटकन म्हणाली, ''आम्हीही माझ्या धाकट्या बहिणीसाठी, कवितासाठी स्थळ बघत आहोत. ती आय सर्जन आहे.''

आशिष यांनी संध्याला मग मेळघाट इथं ते करत असलेल्या कामाचं स्वरूप सांगितलं आणि त्यांच्या अटी सांगितल्या.

''जात हा आपल्या समाजासाठी एक शाप आहे. जातिपातीच्या भेदभावामुळे कितीतरी लोकांवर अत्याचार झालेले आहेत.'' आशिष सांगत होते. त्यांना दुसऱ्या जातीच्या मुलीशी लग्न का करायचं आहे त्याचं कारण सांगत होते. ''आपल्या समाजातली ही जातिपातीची पाळंमुळं दूर करायची असतील तर आंतरजातीय लग्नं व्हायला हवीत.''

संध्याला आशिष यांच्या कामाबद्दल जाणून घेण्याची उत्सुकता आहे हे बघितल्यावर ते म्हणाले, '''माझ्या आईवडिलांना भेटायला वर्ध्याला जाण्याऐवजी तुम्हीच तुमच्या घरच्यांना मेळघाटला का पाठवत नाही? मी तिथं कसा राहतो, काय काम करतो ते तुम्हीही बघा.''

आशिषनी डॉ. संध्याला धारिणीच्या खडतर आयुष्याची पूर्वकल्पना दिली. ''तुम्हाला तिथं रात्री राहावं लागेल, कारण त्याच दिवशी परतीची बस मिळणार नाही.'' येताना पिण्याचं पाणी आणण्याबद्दलही त्यांनी बजावलं. त्यांना तिथल्या दूषित पाण्यामुळे कुठलाही आजार होऊ नये म्हणून त्यांना ही खबरदारी घ्यायची होती.

डॉ. संध्या यांनी जेव्हा त्यांच्या आईवडिलांना, आशिष यांच्या मेळघाटमधील कामाबद्दल सांगितलं तेव्हा चंपतराव आणि गिरिजा रेंगे यांना या तरुण डॉक्टरच्या कामाचं कौतुक वाटलं. चंपतराव हे वनाधिकारी होते तर गिरिजा या शाळेत शिक्षिका होत्या. ते अकोल्याला राहत होते. त्यांना एक मुलगा आणि तीन मुली होत्या. कविता सगळ्यात लहान होती. या चारही भावंडांनी त्यांच्या आईवडिलांना कायम दुसऱ्यांना मदत करताना बघितलं होतं.

चंपतराव बऱ्याचदा चप्पल किंवा शर्ट न घालता यायचे. कधी त्यांचा स्वेटरही कोणालातरी दिलेला असायचा. त्यांना त्यांची पत्नी त्याबद्दल विचारायची तेव्हा माझ्यापेक्षा गरजू व्यक्तीला मी ते दिलं, असं ते सहजपणे सांगायचे. गिरिजाताई त्यांनी प्रेमानं विणलेला स्वेटर कोणाला तरी दिला

म्हणून जरा रागवायच्या, पण लगेचच त्यांच्या चेहऱ्यावर हसू यायचं. गरजू माणसाला मदत केल्यानं त्यांनाही बरं वाटायचं. रेंगे कुटुंबाच्या घराजवळ नर्सिंग होम होतं. तिथं खेड्यातून उपचार घ्यायला येणाऱ्या रुग्णांच्या नातेवाइकांना गिरिजाताई जेवण द्यायच्या. त्या त्यांना ओळखतही नसायच्या किंवा त्या लोकांनी जेवण मागितलेलंही नसायचं. तरीही त्यांची गरज ओळखून त्या त्यांना जेवण देत असत. त्यात त्यांचा आनंद होता.

कविता सगळ्यात धाकटी असल्यानं सर्वांची लाडकी होती. ''मला जे हवं ते नेहमीच मिळालंय.'' डॉ. कविता सांगत होत्या. सांगतानाही त्यांच्या डोळ्यांतली चमक दिसत होती. त्या आठवणींनी त्यांचा चेहरा उजळला होता. छोट्या कवितासाठी तिची मोठी बहीण जे म्हणेल ती पूर्वदिशा, असं होतं. तिच्या व्यक्तिमत्त्वानं कविता भारावून जात असे. हॉस्पिटलमध्ये रुग्ण, बहिणीचा आदर करायचे हे पाहून ती फार प्रभावित व्हायची. आपणही तिच्यासारखं डॉक्टर व्हायचं हा कविताच निर्धार होता. १९९३ला त्यांनी नागपूरच्या 'इंदिरा गांधी मेडिकल कॉलेज'मध्ये एमबीबीएसला प्रवेश मिळवला.

मेडिकल कॉलेजमध्ये सुदैवानं तिला 'जनरल सर्जरी' हा विषय हाऊस जॉबसाठी मिळाला. सुरुवातीला त्या विषयासाठी लागणारी मेहनत आणि त्याची थोडी भीती, यामुळे फारशी आवड नव्हती. पण बहिणीच्या पाठिंब्यानं त्यांनी तो हाऊस जॉब पूर्ण केला. जनरल सर्जरीतल्या हाऊस जॉबमध्ये कराव्या लागणाऱ्या कष्टाचा फायदा, मेळघाटमध्ये काम करताना खूप झाला. विशेषतः वेगवेगळ्या आजारांवर उपचार करताना, अनेक प्रकारच्या जखमांवर उपचार करताना त्याचा उपयोग झाला.

कविताला नेत्रतज्ज्ञ व्हायचं होतं, पण तिला त्यासाठी डिप्लोमाला प्रवेश मिळाल्यानं ती जरा नाखूश झाली. तिच्या बरोबर असणाऱ्या एका विद्यार्थ्याला तिच्यापेक्षा कमी मार्क्स मिळूनदेखील डिग्रीला प्रवेश मिळाला. तेव्हा मात्र कविताला रडू आलं. तेव्हा तिला हसवण्यासाठी तिची बहीण गमतीनं म्हणाली, ''तू खेड्यात जाऊन काम केलंस तर तू डिप्लोमा केलाय की डिग्री, कोणाला काही फरक पडणार नाही.'' मात्र कविता अतिशय निडर आणि निश्चयी होती. ती असा अन्याय सहन करणाऱ्यातली नव्हती. ती या

अन्यायाविरुद्ध कोर्टात गेली. त्या केसचा निकाल लागायच्या आतच तिला पुढच्या प्रयत्नात डिग्रीला प्रवेश मिळाला. तिच्या यशाचा सर्व कुटुंबाला अतिशय अभिमान वाटला. गिरिजाताईंनी नेत्रतज्ज्ञाला लागणारी सगळी उपकरणं तिच्यासाठी विकत आणली.

सगळ्यात धाकटी असल्यानं कविता तिच्या आईवडिलांना आणि भावंडांना खूप जवळची होती. तिनं वर्ध्याच्या मेडिकल कॉलेजमध्ये शिकवण्याचा एक छोटासा प्रयत्न केला, पण लवकरच तिला घराची आठवण येऊ लागली. त्यातल्या त्यात तिची मधली बहीण छाया तिच्याबरोबर राहत होती हा एक दिलासा होता. तरीही तिला आईवडिलांची एवढी आठवण येऊ लागली, की तिनं नोकरी सोडली आणि ती अकोल्याला परत गेली. तिच्या इंजिनिअर भावानं जेव्हा ईएनटी सर्जन मुलीशी लग्न केलं तेव्हा तिच्या जिवात जीव आला. घरात नवीन लग्न होऊन आलेल्या वहिनीनं तिच्या घराची आणि वयस्कर आईवडिलांची जबाबदारी घेतली. या सुमारास तिच्या घरचे तिच्यासाठी स्थळ बघू लागले.

रेंगे कुटुंबांनी डॉ. आशिष सातव यांचं निमंत्रण स्वीकारून मेळघाटला भेट द्यायचं ठरवलं. त्यांनी जेवण, पाणी अशी सगळी सामग्री घेतली आणि दोन दिवसांच्या मेळघाट भेटीसाठी निघाले. कविताही त्यांच्याबरोबर होती. त्यांनी जेव्हा आशिष यांचं काम बघितलं तेव्हा ते प्रभावित झाले होते, पण त्यांची द्विधा मनःस्थिती झाली होती.

गावात एक चक्कर मारल्यावर आणि हॉस्पिटल आणि ओपीडी बघितल्यावर ते हॉस्पिटलच्या आत गेले. तिथं रुग्णांचा गडबड गोंधळ चालू होता. आशिष ज्या निष्ठेनं काम करत होते, ते पाहून त्यांना समाधान वाटलं. पण अशा दुर्गम भागात, कुठल्याही सुविधांचा अभाव असलेल्या जागी आपली मुलगी राहणार याची ते कल्पनाही करू शकत नव्हते.

हळू आवाजात एका खोलीत त्यांची चर्चा सुरू झाली. शेजारच्याच खोलीत डॉ. आशिष काम करत होते. रेंगे कुटुंबानं जवळजवळ एकमतानं

होकार द्यायचं ठरवलं. आशिष यांनी जे ठरवलं होतं ते काम त्यांना एकट्यानं करणं शक्य नव्हतं हे तर उघडच होतं. त्याचं काम समजून घेऊन, त्यामागच्या भावना समजून घेऊन गरिबांच्या सेवेत त्याला साथ देणारी जोडीदार त्याला मिळाली तर त्याचं ध्येय साध्य व्हायला मदत होईल हे त्यांना समजलं. कविता ती भूमिका पार पाडायला योग्य जोडीदार ठरेल असं त्यांना वाटलं.

संध्यानं मात्र अधिक व्यावहारिक विचार केला. सर्जन म्हणून तिची धाकटी बहीण किती समर्पणवृत्तीनं काम करणारी आहे हे तिला माहीत होतं. 'आशिष बुद्धिमान आहे आणि त्यानं त्याच्या व्यवसायाचं नियोजन व्यवस्थित केलं आहे, त्यामुळे तर त्यानं मेडिसिनमध्ये एम.डी. केलं आहे.' ती म्हणाली, ''त्याला इथं भरपूर पेशंट्स मिळतील, पण तू नेत्रतज्ज्ञ आहेस. तू इथं सर्जरी कशा करणार?'' संध्यानं तिला आठवण करून दिली, तिचे प्रोफेसर तिला न घेता दुसऱ्या विद्यार्थ्याला सर्जरी करायला घ्यायचे तेव्हा तिला खूप वाईट वाटायचं. ''इथं तर तुला मोतीबिंदूची ऑपरेशन्स फक्त वाघांवर करायला मिळतील.'' संध्या बहिणीला चेष्टेनं म्हणाली.

मात्र रेंगे कुटुंब इतकं सुस्वभावी होतं, की शेवटी त्यांनी आशिष यांच्या बाजूनं कौल दिला. आशिष आणि कविता यांची जोडी अनुरूप होईल असं त्यांना वाटलं. या दोघांच्या अनेक वर्षांच्या सुखी सहजीवनानं, रेंगे कुटुंबाचा निर्णय योग्य होता हे सिद्ध झालंय. ''ज्या समर्पित वृत्तीनं कविता सेवा करते ते बघितलं, की ती माझ्या कितीतरी पुढे गेली असल्याचं मला जाणवतं.'' डॉ. आशिष कविताबद्दल सांगत होते.

रामभाऊ सातव यांच्या दोन मुलांची लग्नं थाटामाटात झाली, पण जेव्हा आशिषनं आपल्याला साधेपणानं लग्न करायचं असल्याचं सांगितलं तेव्हा त्यांना आश्चर्य वाटलं नाही. जे पैसे लग्नावर खर्च झाले असते ते त्यानं मागितले. ते पैसे त्याला मेळघाटमध्ये 'क्रिटिकल केअर हॉस्पिटल' बांधण्यासाठी वापरायचे होते. ३० नोव्हेंबर १९९८ साली कविता आणि आशिष यांचा विवाह अकोला इथं नोंदणी पद्धतीनं झाला. दोन्हीकडचे दहा लोक लग्नाला उपस्थित होते. दहा दिवसांनी नवविवाहित जोडपं मेळघाटला परतलं.

धारिणीच्या हॉस्पिटलमधल्या घरात डॉ. कविता सातव या नवपरिणीत वधूनं प्रवेश केला. लग्नाचे सुरुवातीचे दिवस किडे आणि इतर सरपटणाऱ्या प्राण्यांशी सामना करण्यात गेले. साप, विंचू आणि इतर भीतिदायक जीव, घरात तसंच क्लिनिकमध्ये बऱ्याच वेळा भेट द्यायचे. त्यांना उचलून फेकून देण्यासाठी लोकांना बोलावून ते दोघं कंटाळले. शेवटी त्यांनी दोघांनी हे काम करायचं ठरवलं. लवकरच ते अगदी विषारी नागही सराईतपणे पकडू लागले.

लवकरच त्यांच्या लक्षात आलं, की त्यांचा दिवसभरातला बराचसा वेळ हा किडे, साप पकडण्यात जातोय. या जाणिवेनं ते अस्वस्थ झाले. मेडिकल कॉलेजमध्ये असताना दिवसाला शंभरेक रुग्ण तपासायची सवय असलेल्या या तरुण उत्साही जोडप्याला असं रुग्णांची वाट बघत बसणं कंटाळवाणं होऊ लागलं. डोळ्यांच्या दुखण्यासाठी डोळ्यांचे खास डॉक्टर असतात, हे मेळघाटच्या लोकांना माहीतच नव्हतं. मुळात काही झालं, की डॉक्टरांकडे जायला ते विशेष तयार नसत. आदिवासी लोक त्यांच्या समाजातल्या पारंपरिक वैदूकडे जाऊन पारंपरिक औषधं घ्यायचे.

त्यांच्यासाठी आजारावर इलाज म्हणजे काळी जादू किंवा औषधी वनस्पतींचा वापर. आशिष आणि कविता हे डॉक्टर्स आहेत यावर त्यांचा मुळात विश्वास नव्हता. शहरातून शिकून आलेले डॉक्टर्स, त्यांच्यात येऊन राहतील आणि त्यांना दवापाणी देतील, उपचार करतील हे त्यांना समजण्यापलीकडे होतं.

तिथल्या लोकांना अनेक प्रकारच्या व्याधी होत्या. न्यूमोनिया, डायरिया, सेरेब्रल मलेरिया यांसारखे रोग वेळेवर काळजी घेऊन किंवा उपचार करून बरे होऊ शकत होते. मात्र इथं या आजारांनी माणसं मरत होती. कुपोषणाची समस्या गंभीर होती. ही समस्या स्थानिक आदिवासी लोकांच्या खाण्याच्या सवयींमुळे आणि जीवनशैलीमुळे होती. या सगळ्यामुळे या दोन तरुण डॉक्टर्सच्या निराशेत भर पडत होती. स्थानिक लोकांना समजवावं तर ते हॉस्पिटलची पायरी चढायलाही तयार नव्हते. अगदीच

गंभीर परिस्थिती झाली तरच ते यायचे, पण तोपर्यंत इलाज करायला उशीर झालेला असायचा.

एकदा हार्ट अ‍ॅटॅक आलेल्या एका माणसाला रात्री धारिणीच्या प्रायमरी हेल्थ सेंटरमध्ये दाखल केलं होतं. तेव्हा मध्यरात्र झाली होती आणि तिथं कोणी डॉक्टर्स नव्हते, त्यामुळे डॉ. आशिषना बोलावण्यात आलं. तिथं अशा आणीबाणीच्या वेळी उपचार देण्यासाठी कोणतीही सुविधा नव्हती. कार्डियाक मॉनिटर किंवा इतर उपकरणं नव्हती. सर्वात जवळचं 'क्रिटिकल केअर हॉस्पिटल' १५० किलोमीटर अंतरावर होतं.

डॉ. आशिष सायकलवरून तिथं गेले. बरोबर ईसीजी मशीन होतं. एका बॅगेत औषधं होती आणि बरोबर काळजीचं ओझं होतं. कॉलेजमध्ये असताना अशा इमर्जन्सी पेशंटला उपचार देण्यासाठी तीन–चार डॉक्टर्स असायचे. बरोबर प्रशिक्षित नर्स आणि सर्व सुविधांनी सुसज्ज असलेला आय.सी.यू. विभाग असायचा. इथं मात्र त्यांच्याबरोबर सातवी पास असलेला अटेंडंट होता. आशिषना याची जाणीव होती, की उपचार सुरू केल्यावर जर पेशंट मेला तर लोकांचा त्यांच्यावरचा विश्वास उडेल. त्यांनी सगळं बळ एकवटलं, काळजीला दूर ठेवलं आणि उपचाराला सुरुवात केली. पहाटे तो माणूस धोकादायक स्थितीतून बाहेर आला आणि डॉ. आशिष स्थानिक लोकांमध्ये पहिली परीक्षा पास झाले. त्यानंतर ब्रेन हॅमरेजमुळे कोमात गेलेल्या एका पेशंटला त्यांनी उपचार करून बरं केलं आणि स्थानिक लोकांनी डॉ. आशिषना विश्वास ठेवता येईल असा डॉक्टर म्हणून स्वीकारलं. इंदोर आणि अमरावती येथील हॉस्पिटल्सनी पन्नास वर्षांच्या या रुग्णाला दाखल करून घ्यायला नकार दिला आणि त्याला मेळघाटला परत आणलं गेलं. डॉ. आशिष सात दिवस त्याच्या बाजूला बसून होते. सतत त्याला तपासात औषधं देत होते. हॉस्पिटलच्या बाहेर चाळीसेक लोक बसून होते. आठव्या दिवशी तो रुग्ण उठून चालू लागला. त्या दिवशी गावातल्या लोकांचा डॉ. आशिषवर विश्वास बसला तो आजतागायत!

लोक गावात अनेक आजारांनी मरत आहेत असं या दोघांच्या कानावर येत असलं तरी त्यांच्याकडे उपचारासाठी फार कमी लोक येत होते. एक दिवस डॉ. कविता यांनी ठरवलं, जर पेशंट डॉक्टरकडे येत नसेल तर डॉक्टर पेशंटकडे जाईल आणि तपासून उपचार करेल. दोघंही जवळपासच्या गावात बसनं जाऊ लागले आणि आजारी लोकांना तपासू लागले. अगदी कानाकोपऱ्यातल्या वस्तीत जिथं बसही पोचत नव्हती तिथं ते पायी किंवा बैलगाडीतून जाऊ लागले. कित्येक रात्री त्यांनी दाट जंगलात, खुल्या आकाशाखाली काढल्या आहेत. एके रात्री दिवसभर कष्ट करून दमल्यावर त्यांना गावातल्या लोकांनी उघड्यावर झोपायला कॉट दिली. आशिष आणि कविता यांना त्या भागात वाघ येतो आणि गुरं उचलून नेत असल्याचं माहीत होतं. झोपताना त्या विचारानं कविता खूप घाबरल्या. रात्री कधीतरी त्यांच्याजवळून खुसफुस असा आवाज आला. त्यांच्या पायाला प्राण्याचा स्पर्श झाला. त्या इतक्या घाबरल्या होत्या, की त्यांना हलायचीही भीती वाटत होती. तोंडातून किंकाळी बाहेर पडेल या भीतीनं तोंड दाबून धरलं. नंतर त्यांच्या लक्षात आलं की वासरू होतं आणि ते कॉटजवळ बसत होतं, तेव्हा आपल्या झालेल्या फजितीमुळे त्यांना हसू आवरत नव्हतं.

मात्र कविता गरोदर राहिल्यावर अशा धाडसी मोहिमा करणं त्यांनी बंद केलं. त्यांच्या लग्नानंतर तीन वर्षांनी, १ मे २००१ साली त्यांनी मुलाला जन्म दिला. बाळाचं नाव 'अथांग' असं ठेवलं. त्याचा जन्म अकोल्याला झाला. अथांग दोन महिन्यांचा झाल्यावर कविता मेळघाटला परत आल्या.

आदल्याच वर्षी कविता यांनी धारिणी इथं 'डोळ्यांचं हॉस्पिटल' उभं केलं होतं. मात्र तिथं रुग्ण येत नव्हते, कारण त्या आदिवासींना उपचाराचा खर्च परवडणारा नव्हता. त्या भागात डोळ्यांच्या समस्या असलेली बरीच माणसं आहेत आणि साध्या उपचारानं त्या समस्या बऱ्या होऊ शकतात हे त्यांना माहीत नाही या वास्तवाची कविता यांना जाणीव होती. त्यांनी मग गावोगावी फिरून, घराघरांत जाऊन अशा रुग्णांचा शोध घेतला.

कविता यांना अथांगला एकटं सोडता यायचं नाही. त्यांनी तिथल्या एका बाईला त्याची देखभाल करायला सांगितलं. अथांग, त्याला सांभाळणारी बाई यांना घेऊन त्या फिरायच्या. अशा प्रकारे त्यांनी पन्नास

गावं पालथी घालून मोतीबिंदू आणि इतर आजार असलेले रुग्ण शोधले. कविता रुग्णांना तपासात असताना त्या अथांगला झोळीत झोपवायच्या. दोन झाडांच्या खोडांना चादर बांधून केलेल्या झोळीत अथांग झोपायचा. त्याला सांभाळणाऱ्या मावशी जवळ बसून त्याच्यावर लक्ष ठेवायच्या. कविता रुग्णांवर उपचार करण्यात मग्न असायच्या.

आशिष यांच्या कुटुंबीयांना त्यांचे कष्ट माहीत असल्यानं त्यांना काहीतरी मदत करण्याची इच्छा असायची. त्यांच्या मोठ्या भावांनी त्यांना SUV गाडी दिली, कारण आशिष आणि कविता गावोगावी बैलगाडीतून फिरतात हे त्यांना माहीत होतं. आता अथांग झाल्यावर तर हे असं फिरणं आणखी धोकादायक होतं. कविता या गाडीचा उपयोग रुग्णांना हॉस्पिटलमध्ये आणण्यासाठीही करत असत. तिथं आणून त्या आवश्यक सर्जरी करायच्या. त्या रुग्णांसाठी कविता जेवणही बनवायच्या. त्यांची आई अकोल्याला ओळखदेख नसलेल्या रुग्णांना जेवण करून घालायच्या तेच संस्कार त्यांच्यावरही झाले होते.

डॉ. कविता यांची निःस्वार्थ सेवा लोकांच्या लक्षात येऊ लागली. हळूहळू लोकांना त्यांच्यावरचा विश्वास वाढू लागला. अचानक काहीही झालं तर ते डॉ. कविता यांच्याकडे जाऊ शकतात ही भावना त्यांना दिलासा देऊ लागली. एकदा एका कुटुंबानं त्यांना प्रसूतीच्या वेळी मदतीला बोलावलं. त्या कुटुंबाच्या बऱ्याच लोकांवर त्यांनी उपचार केले होते. 'मला प्रसूतीचं प्रशिक्षण नाही' असं कविता यांनी त्यांना सांगितलं. त्या गरोदर स्त्रीला त्यांनी कुठल्यातरी हॉस्पिटलमध्ये न्यावं असं त्यांनी सुचवलं. पण ते कुटुंब तीन दिवसांनी परत आलं. अजून बाळ जन्माला आलं नव्हतं. त्यांनी कविता यांना मदतीसाठी विनवणी केली.

हा निर्णय अवघड होता. त्यांची पहिली प्रतिक्रिया नाही अशीच होती. त्या वेळी डॉ. आशिष कोलापूर इथं ओपीडीमध्ये गुंतलेले होते. धारिणीमधलं त्यांचं हॉस्पिटल बंद होतं. प्रसूतीच्या वेळी लागणारी उपकरणं हाताशी नव्हती, पण शेवटी कविता या काम आणि कर्तव्याप्रति अमाप निष्ठा असणाऱ्या डॉक्टर होत्या, त्यामुळे त्यांनी शेवटी मनाचा हिय्या करून मोतीबिंदूच्या ऑपरेशनला लागणारी उपकरणं घेऊन त्या कुटुंबाचं घर गाठलं.

त्यांच्याकडे असलेल्या वैद्यकीय ज्ञानाचा, कौशल्याचा आणि निश्चयाचा त्या दिवशी कस लागला. भरपूर मेहनत करून त्यांनी ते दिव्य पार पाडलं आणि बाळाला या जगात आणलं. घरातल्या एकीनं जेव्हा मुलगा झाल्याचं सांगितलं तेव्हा त्या कुटुंबाच्या आनंदाला पारावर उरला नाही. पारंपरिक पद्धतीनं थाळ्या वाजवून दारावर थाप मारून त्यांनी जल्लोष केला. पण हे होत असताना डॉक्टर कविता यांची लढाई संपली नव्हती. ते बाळ अजून रडलं नव्हतं आणि त्याला रडवायची खटपट त्या करत होत्या.

जिवाच्या आकांतानं त्या बाळाच्या पाठीवर थपडा मारून, गरम आणि गार पाण्यानं शेकत होत्या. काही मिनिटांनी त्या बाळानं क्षीण आवाज काढला. तेवढ्यानं कविता यांच्या आशा पल्लवित झाल्या. बाळ त्याच्या पोटात गेलेल्या पाण्यानं गुदमरत आहे, त्यामुळे ते पाणी बाहेर काढलं पाहिजे हे त्यांच्या लक्षात आलं. जराही वेळ न घालवता त्यांनी त्या बाळाला जवळ धरलं आणि घराबाहेर येऊन धारिणीला हॉस्पिटलमध्ये पोचण्यासाठी काही वाहन मिळत आहे का ते बघितलं. त्यांना फारशी चांगल्या अवस्थेत नसलेली एक टॅक्सी मिळाली, ती दोन गावात फेऱ्या मारायची. त्यात बसून त्या धारिणीला आल्या. कविता यांनी सक्शन मशीन मागवलं. हे सक्शन मशीन हातानं बनवलेलं होतं. त्यांनी त्याच्या पोटातलं पाणी ड्रेन करून बाहेर काढल्यावर त्या बाळानं मोकळा श्वास घेऊन पहिला टाहो फोडला.

आता बाळ व्यवस्थित आहे याची खात्री पटल्यावर त्यांनी बाळाला परत घरी आणलं. तेव्हा त्यांच्या लक्षात आलं, की त्यांचं काम अजून पूर्ण झालं नाहीये. त्या बाळाची आई वाईट परिस्थितीत होती आणि तिला खूप ब्लिडिंग होत होतं. संध्याकाळ झाल्यामुळे अंधार होऊ लागला होता. वीज तर नव्हतीच. टॉर्चच्या उजेडात त्यांनी आईला टाके घातले. ते काम झाल्यावर त्यांना बाळाच्या जोरजोरानं रडण्याचा आवाज ऐकू येऊ लागला. बाळाला भूक लागली होती. त्याला पाजायची गरज होती. त्या वेळी कविता यांच्या लक्षात आलं की आईला दूध येत नाहीये. ती बाळाला पाजू शकत नव्हती. आईच्या दुधाशिवाय ते बाळ जगणं शक्य नव्हतं.

ज्या बाळाला त्यांनी या जगात आणलं त्यानं भुकेसाठी फोडलेला टाहो ऐकून कविता यांचं मन हेलावलं. ते जर उपाशी राहिलं तर त्यांनी केलेले

सगळे प्रयत्न वाया जाणार होते, ते बाळ दगावलं असतं. त्या वेळी कविता या अथांगला अंगावर पाजत होत्या. त्यांनी त्या बाळालाही पाजलं. पुढचे काही आठवडे त्या बाळाला स्वतःचं दूध पाठवत होत्या. त्या बाळाला जरा ताकद येईपर्यंत त्यांनी त्याची भुकेची गरज भागवली. तो मुलगा आता उंच धिप्पाड तरुण झालाय. केवळ कविता यांच्यामुळे आपण जगलो, वाचलो याची त्याला जाणीव आहे, बूज आहे. डॉ. कविता नसत्या तर त्यानं हे जग बघितलं नसतं ही गोष्ट त्याच्या कायम स्मरणात आहे.

आशिष आणि कविता हे पतिपत्नी, स्थानिक लोकांना मदत करण्यासाठी आपलं आयुष्य पणाला लावत आहेत, पण त्यांच्या वैयक्तिक आयुष्यातल्या कठीण प्रसंगात त्यांना कोणाची मदत मिळत नव्हती. एक प्रकारच्या असहाय भावनेतून ते गेलेले आहेत.

अथांगच्या तब्येतीच्या अनेक तक्रारी सुरू झाल्या आणि त्यांच्या आयुष्यातील तो कठीण काळ सुरू झाला. डिसेंबरच्या एका कडक थंडीच्या रात्री २००२ साली त्यांना अथांगच्या रडण्यानं जाग आली. त्याला खूप ताप होता. हात लावल्यावर चटका बसावा इतका ताप होता. आशिषनं तापासाठी औषधं द्यायला सुरुवात केली, पण त्यांच्या लक्षात आलं, की बाळाच्या पोटातही खूप दुखत आहे. बाळाचे आईबाबा दोघंही गोंधळले. इतक्या रात्री दोन वाजता त्याला हॉस्पिटलमध्ये नेण्यासाठी त्यांच्याकडे काही सोय नव्हती. रस्ते फार वाईट असल्यानं प्रवास अशक्य नसला तरी धोकादायक नक्कीच होता. अथांगचं कळवळून रडणं ऐकून त्यांचं हृदय पिळवटून निघत होतं. आशिष यांनी शेवटी स्वतःचं क्लिनिकल जजमेंट वापरायचं ठरवलं. त्यांनी औषधं बदलली आणि उपचाराची दिशाही बदलली. सकाळपर्यंत अथांगची तब्येत सुधारली. पण त्यानंतर आणखी काही समस्या त्यांची वाट बघत होत्या.

लवकरच अथांगला न्यूमोनियाचा संसर्ग झाला. एक आठवडा झाला तरी त्याच्या तब्येतीत काही सुधारणा होईना. त्याच्या वडिलांनी दिलेल्या

औषधांचा काही उपयोग होत नव्हता. मेळघाटात कोणी स्पेशालिस्ट किंवा बालरोगतज्ज्ञ नव्हता. आपल्या मुलाला आपण बरं करू शकत नाही या गोष्टीनं वैतागलेल्या डॉ. आशिष यांनी शेवटी नागपूर आणि वर्धा इथल्या बालरोगतज्ज्ञांना फोन केले. त्यांनी औषधं बदलली आणि पुढे दहा दिवसांत अथांगची तब्येत सुधारली.

मुलाच्या सतत दुखण्यांचा परिणाम त्याच्या आईवडिलांवर होऊ लागला. त्यांना रात्र रात्र जागावं लागायचं. तो तीन वर्षांचा असताना त्याला अस्थमाचा आजार जडला. मेळघाटातल्या थंड आणि ओलसर हवेमुळे त्याचं दुखणं बळावत गेलं.

त्यानंतर कानाचा पडदा फाटल्याची घटना घडली.

अशा एकामागून एक येणाऱ्या संकटांना तोंड देत असताना आशिष आणि कविता यांनी कामावरची त्यांची निष्ठा कमी होऊ दिली नाही. अथांगच्या दुखाण्यांनी ते खचले नाहीत, त्याची काळजी घेत राहिले. अथांगच्या तब्येतीच्या तक्रारींमुळे एक झालं, की मुलावर योग्य उपचार करता यावेत यासाठी आशिष यांनी बालरोगशास्त्रावरची मेडिकलची पुस्तकं वाचायला सुरुवात केली. याचा फायदा त्यांना इतर मुलांवर उपचार करण्यासाठी झाला.

अथांगच्या कानाच्या आजाराच्या घटनेनंतर एके दिवशी एक विधवा स्त्री तिच्या गंभीर आजारी मुलाला घेऊन रात्री हॉस्पिटलमध्ये आली. तिला मुलाला घेऊन सिटी हॉस्पिटलमध्ये पाठवावं असं आशिष यांना वाटलं. रुग्णाला तपासायला स्पेशालिस्ट केव्हाही चांगला, असं त्यांना मेडिकल कॉलेजमध्ये शिकवलं होतं. पण आशिष यांना त्यांचा स्वतःचा मुलगा आजारी पडल्यावर किती असहाय वाटलं होतं ते आठवलं. रात्री-बेरात्री या बाईला, तिच्या मुलाला तपासायला नकार देणं त्यांना बरोबर वाटेना. १५० किलोमीटर अंतरावर असलेल्या हॉस्पिटलमध्ये पोचायला तिच्याकडे काहीच सोय नव्हती किंवा पैसे नव्हते. पुस्तकातून वाचून आशिष यांनी मुलावर उपचार केले आणि त्याला अक्षरशः मरणाच्या दाढेतून बाहेर काढलं.

एक पाच वर्षांची सेरेब्रल मलेरिया झालेली मुलगी हॉस्पिटलमध्ये आली तेव्हाही हेच झालं. तिला फिट्स येत होत्या. तिला अर्ध्या तासात उपचार

मिळाले नाही तर ती वाचणार नाही हे डॉ. आशिष यांच्या लक्षात आलं. त्यांनी त्यांच्या मुलाच्या शारीरिक व्याधीतून बरं केलं, तसंच त्यांनी त्या मुलीच्या बाबतीत करायचं ठरवलं. अट्ठेचाळीस तासांनंतर ती बरी व्हायला लागली आणि आशिष यांनी पुन्हा एकदा यश मिळवलंय हे लक्षात आलं. त्या मुलीचे प्राण वाचले.

अशा घटनांमुळे डॉ. सतीश यांचा आत्मविश्वास वाढायला मदत झाली.

गावातले लोक आता या जोडप्यावर विश्वास टाकू लागले, पण आजारी पडल्यावर हॉस्पिटलमध्ये दाखल होणं हे अजूनही त्यांना सवयीचं नव्हतं. सातव पतिपत्नी त्यांच्या आरोग्यासंदर्भात मदत करू पाहत होते, पण आदिवासी अजूनही पारंपरिक औषधं देणाऱ्या वैदूंकडे जात होते. या वैदूंना कुठलंही औपचारिक शिक्षण नव्हतं. एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे माहिती आणि ज्ञान सोपवलं जात होतं.

एके दिवशी आशिष हे कोलापूर इथं त्यांच्या ओपीडीमध्ये बसले होते. ती ओपीडी म्हणजे एक मातीची झोपडी होती. तिथं एक बाई तिच्या नऊ वर्षांच्या मुलाला घेऊन आली. त्या मुलाला न्यूमोनियाचा तीव्र आजार होता. तोपर्यंत त्याच्यावर बनावट डॉक्टरांनी उपचार केले होते. त्याच्या छातीवर पक्ष्यांची पिसं चिकटवली होती. त्याच्या अंगावर सगळीकडे हळद लावली होती. अंगावर भाजल्याच्या खुणा होत्या. तापलेल्या लोखंडी सळईनं त्याला चटके दिले गेले होते. त्याची अवस्था खूप गंभीर होती.

डॉक्टरांनी त्याच्या आईला सांगितलं, की मुलाला लगेचच हॉस्पिटलमध्ये दाखल करायची गरज होती. त्या मातेनं नकार दिला. ती म्हणाली, ''मला तीन मुलांची काळजी घ्यायची आहे. घरात गुरंढोरं आहेत, त्यांना बघायचं आहे.'' डॉ. सतीश तिचं पुढचं बोलणं ऐकून थक्क झाले. ''हा मुलगा तर आता वाचणार नाही, मग कशाला एवढ्या लांब हॉस्पिटलमध्ये जाऊ?''

आशिषना यावर काय बोलावं ते कळेना. ते शहरातले डॉक्टर होते, आईवडील पोटच्या मुलावर उपचार करणं सोडून तो आता मरणार असं गृहीत धरतात हे त्यांना समजण्यापलीकडे होतं. पण त्या गरीब बिचाऱ्या आईला मागे जिवंत असलेल्या मुलांकडे लक्ष द्यायचं होतं. चार दिवसांनी ते मूल कुठल्याही उपचारांशिवाय मरण पावलं. त्या घटनेनंतर

आशिष आणि कविता या दोघांना आपण किती अपुरे पडत आहोत याची जाणीव झाली.

नव्वदच्या दशकात आणि २०००च्या पहिल्या दशकात, मेळघाटमधील बालकांच्या मृत्यूच्या बातम्या सगळीकडे येत होत्या. मुलं कुपोषणामुळे दगावत होती, डायरिया, न्यूमोनिया हेदेखील मोठ्या प्रमाणावर आढळणारे आजार होते. गावात मुलं दगावल्याच्या बातम्या आशिष आणि कविता सतत ऐकत होते.

२००३ साली पावसाळ्यात दोन गावांत एकाच आठवड्यात पाच मुलं दगावली. त्यानंतर दोन रात्री कविता झोपू शकली नाही. तिनं आशिष यांनाही झोपू दिलं नाही. ''आपण दोघंही डॉक्टर आहोत आणि आपल्याजवळच्या भागात एवढी मुलं दगावत आहेत, हे मला आता सहन होत नाही.'' तिनं आशिष यांना मध्यरात्री सांगितलं. ''आपण ओपीडी बंद करू या आणि गावात जाऊन मुलांवर उपचार करू यात.''

मेळघाटमध्ये ३१७ गावं होती. प्रत्येक गावात जाऊन उपचार करणं हे त्या दोघांना शक्य नाही याची डॉ. आशिष यांना कल्पना आली. त्यांनी मोठ्या मुश्कीलीनं कविता यांना समजावलं की 'फिरतं हॉस्पिटल' हे काही त्यावरचं उत्तर नाही. त्यांनी अधिक व्यावहारिक उत्तर शोधण्याचं वचन त्यांना दिलं.

मग त्यांनी डॉ. अभय बंग यांच्या वैद्यकीय व्यवसायाचं उदाहरण डोळ्यांसमोर ठेवलं. त्यांनी ज्याप्रमाणे स्थानिक लोकांना, कुपोषणाच्या समस्येचा मुकाबला करण्यासाठी तयार केलं, त्याच पद्धतीनं आशिष यांनी बेअरफूट डॉक्टर्स गावागावांतून तयार करायचं ठरवलं. लहान मुलांना होणारे सर्वसामान्य आजार ओळखून त्यावर उपचार करण्यासाठी त्यांनी थोडंफार शिक्षण झालेल्या आदिवासी मुलींना प्रशिक्षण द्यायला सुरुवात केली. त्यांचं प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर या आरोग्यसेविकांना धारिणी जवळच्या सदतीस गावांत विभागलं गेलं. त्या त्या गावात या आरोग्यसेविका, जन्म-

मृत्यू आणि त्या मुलांना झालेले आजार यांची नोंद ठेवू लागल्या. ही आकडेवारी जमल्यावर एक कटू सत्य बाहेर आलं. सरकार कुपोषित मुलांसाठी मेळघाटमध्ये मोठ्या प्रमाणावर निधी खर्च करत असूनही तो निधी तिथल्या आदिवासी लोकांपर्यंत पोचत नव्हता. तिथं प्रत्यक्ष गेलेल्या या स्वयंसेवकांच्या लक्षात आलं, की सरकारी एजन्सीज, कुपोषणानं झालेल्या मृत्यूची आकडेवारी कमी दाखवत आहेत. यासंदर्भात राज्य सरकारवर दबाव आणण्यासाठी आशिष यांनी त्यांना मिळालेली माहिती उघड करायची असं ठरवलं.

आदिवासी लोक हॉस्पिटलमध्ये का जात नाहीत याचं कारणदेखील त्यांच्या लक्षात आलं. त्यांच्यात आणि सरकारी आरोग्ययंत्रणेतील लोकांमध्ये संवाद होऊ शकत नव्हता. त्यांच्यात मोठी 'कम्युनिकेशन गॅप' होती. ''तिथल्या डॉक्टरांची आणि आरोग्य कर्मचाऱ्यांची भाषा ही आदिवासी लोकांच्या भाषेपेक्षा फार वेगळी होती. त्यांना एकमेकांचं बोलणं समजायचं नाही.'' आशिष यांनी सांगितलं.

जर आदिवासी लोकांना त्यांच्या घरातलं मूल किंवा वयस्कर आजारी माणूस हॉस्पिटलमध्ये आणायला उत्तेजन द्यायचं असेल तर त्यांना तिथल्या लोकांबद्दल विश्वास वाटणं, हॉस्पिटलच्या कर्मचाऱ्यांबरोबर त्यांना मोकळेपणा वाटणं महत्त्वाचं होतं. आदिवासी लोकांमध्ये आणि हॉस्पिटलच्या कर्मचाऱ्यांमध्ये दुवा म्हणून तिथं कोणीतरी असणं महत्त्वाचं होतं.

आशिष त्या वेळी सरकारी हॉस्पिटल्सबरोबर काम करत होते. सरकारी आरोग्य केंद्रात आदिवासी समुपदेशकाची नेमणूक करता येईल का, याबद्दल ते विचार करू लागले. त्यांचा उत्साह आणि पुढाकार यामुळे सरकारी हॉस्पिटलमधील कर्मचारी, स्थानिक राजकारणी आणि ग्रामसभा सदस्य यांनी आक्षेप घ्यायला सुरुवात केली. कोणालाच आहे त्या स्थितीत काही बदल व्हायला नको होता. आशिष यांच्यावर आरोप व्हायला लागले. आशिष आणि कविता यांना या गोष्टीचा खूप त्रास झाला, कारण आरोग्यसेवा पुरवणं हे त्यांचं एकमेव ध्येय होतं.

स्थानिक लोक जर त्यांच्या विरोधात गेले तर त्यातून काही निष्पन्न होणार नाही, त्यांना जे करायचं आहे ते काम होणार नाही हे आशिष

यांच्या लक्षात आलं आणि त्यांनी त्यांचं 'क्रिटिकल केअर हॉस्पिटल' उभं करण्याच्या ध्येयावर लक्ष केंद्रित करायचं ठरवलं. त्यांच्या लग्नाच्या वेळी त्यांच्या वडिलांनी त्यांना यासाठी मदत करायचं कबूल केलं होतं.

रामभाऊंकडून कर्ज घेऊन त्यांनी जंगलात एक हेक्टर जागा घेतली. २००५ साली त्या हॉस्पिटलचं बांधकाम चालू झालं. बांधकामामुळे आशिष यांच्यावर कामाचा अतिरिक्त ताण होता, तो हलका करण्यासाठी त्यांचे आईवडील मेळघाटला आले. २००७ साली आशिष यांचं 'क्रिटिकल केअर हॉस्पिटल'चं स्वप्नं प्रत्यक्षात आलं.

त्या दुर्गम भागातलं हे हॉस्पिटल म्हणजे मेळघाटमधल्या लोकांसाठी वरदान आहे. इथं ॲम्ब्युलन्सच्या सायरनचा किंवा स्ट्रेचरचा, रुग्णांच्या नातेवाइकांच्या गोंधळाचा आवाज येत नाही. तिथल्या उपकरणांचा थोडाफार आवाज आणि प्रत्येक रुग्णाजवळ जाऊन त्याच्याशी हळुवारपणे बोलणाऱ्या एका डॉक्टरचा आवाज असतो. रुग्णांना तपासल्यानंतर तिथल्या नर्सेसना डॉक्टर सूचना देतात. हॉस्पिटलमध्ये सहा नर्सेस रुग्णांची देखभाल करतात.

डॉ. आशिष सातव यांच्यात प्रचंड ऊर्जा आहे. जाड भिंगांच्या चश्म्यातून त्यांचे चमकदार डोळे सतत सजगपणे आजूबाजूचा वेध घेत असतात. हॉस्पिटलमध्ये रुग्णांची रीघ लागलेली असते. मिनिटभरही ते स्वस्थ बसलेले नसतात. देशातल्या आणि विदेशातल्या दानशूर लोकांनी केलेल्या मदतीनं हॉस्पिटल उत्तम प्रकारे चालत आहे. आदिवासी लोकांवर इथं मोफत उपचार होतात.

डॉ. आशिष आणि डॉ. कविता यांच्या अथक परिश्रमामुळे आदिवासी आता आधुनिक उपचार घ्यायला तयार होत आहेत. ते हॉस्पिटलमध्ये येतात तेव्हा एक विश्वास त्यांच्याबरोबर घेऊन येतात. हे दोघं डॉक्टर कुठलाही आजार बरा करू शकतात. कॅन्सरपासून ते भाजण्याच्या अपघातापर्यंत कुठल्याही गंभीर शारीरिक समस्येचं उत्तर त्यांच्याकडे आहे, असं त्या निष्पाप लोकांना वाटतं आणि त्यांनीच उपचार करावेत, असा त्यांचा हट्ट असतो. ''आमच्याकडे आशेनं आलेल्या या लोकांना जर बरं करू शकले नाही तर मी अस्वस्थ व्हायची.'' डॉ. कविता सांगत होत्या.

कुठल्याही प्रकारचे तज्ज्ञ डॉक्टर्स, जनरल सर्जन, भूलतज्ज्ञ यांच्या अनुपस्थितीत आपल्या प्रयत्नांना मर्यादा आहेत हे दुःखद वास्तव त्यांना माहीत आहे. कविता त्यासाठी मेळघाटापलीकडे काही मदत मिळण्याच्या शक्यता आहेत का ते शोधत आहेत. त्यांच्याकडे नेटवर्क करण्याचं कौशल्य आहे. त्यांच्या संपर्कात आलेल्या लोकांना त्या मेळघाटातील लोकांसाठी मदत मागतात. ''नागपूरच्या हॉस्पिटलमधील सर्जन्सना मी फोन करते आणि ते मी पाठवलेल्या रुग्णांना बघतील का यासंदर्भात चौकशी करते.'' त्या सांगत होत्या.

विदर्भातील वैद्यकीय व्यावसायिकांना सातव पतिपत्नीच्या मेळघाटातील अद्‌भुत कामाची माहिती आहे. भारतभरातील डॉक्टर्स, अगदी ऑस्ट्रेलिया येथील डॉक्टर्सही मदतीचा हात पुढे करत आहेत. मेळघाटमधून आलेल्या रुग्णांना उपचार देण्याची त्यांनी तयारी दाखवली आहे. प्रत्यक्ष किंवा व्हिडिओ कॉलच्या माध्यमातून त्यांना कन्सल्ट करण्याची त्यांची तयारी आहे.

मात्र अजूनही ज्यांना शस्त्रक्रियेची गरज आहे त्यांच्यासाठी काही मार्ग निघालेला नाही.

सातव यांच्या या 'क्रिटिकल केअर हॉस्पिटल'मध्ये मोठ्या आणि छोट्या शस्त्रक्रियेसाठी ऑपरेशन थिएटर आहे. आशिष आणि कविता हे देशभरातील डॉक्टरांना मेळघाटमध्ये येऊन शस्त्रक्रिया करण्यासाठी बोलावत आहेत. अनेक फिजिशियन्स, प्लास्टिक सर्जन, नेत्रतज्ज्ञ, कॅन्सरतज्ज्ञ, भूलतज्ज्ञ असे विविध क्षेत्रांतील स्पेशालिस्ट त्यांचं आमंत्रण स्वीकारत आहेत.

वर्षातून एकदा किंवा दोनदा होणारा 'सर्जिकल कॅम्प' डॉक्टर सातव यांच्या नियोजन कौशल्याची परीक्षा घेणारा असतो. त्याचबरोबर त्यांना त्या वेळी मोठ्या प्रमाणावर मनुष्यबळ लागतं. ही सगळी व्यवस्था पार पडण्यासाठी ते आणि त्यांचे सहकारी खूप मेहनत घेतात. अशा वेळी आशिष यांचं संपूर्ण कुटुंब तिथं मुक्काम ठोकून असतं. कॅम्पचं आयोजन केल्यावर रामभाऊ आणि कमल सातव, आशिष यांचे आईवडील तिथं येतात. ते स्वयंपाकघराची जबाबदारी घेतात. तिथं फक्त व्हिजिटर्ससाठी नाही तर रुग्ण आणि त्यांच्याबरोबर आलेल्या घरच्या लोकांसाठीही जेवण बनतं.

सातव यांच्या धारिणी इथल्या हॉस्पिटलमध्ये आत्तापर्यंत हजारेक शस्त्रक्रिया झाल्या आहेत. तज्ज्ञ फिजिशियन्स, आय सर्जन आणि बालरोगतज्ज्ञ यांनी एक लाख रुग्णांवर उपचार केले आहेत. आत्तापर्यंत मेळघाटला आयोजित केलेल्या 'स्पेशालिटी कॅम्प'मध्ये २२००० रुग्णांवर उपचार झाले आहेत.

या सगळ्या प्रवासात सातव पतिपत्नींना अनेक अडचणींना तोंड द्यावं लागलंय, मात्र त्यांनी कधीही धीर सोडला नाही.

२००० साली एका आय सर्जरी कॅम्पच्या वेळी एका स्थानिक माणसानं सातव पतिपत्नींवर जातीवरून अपशब्द वापरल्याचा आरोप ठेवून त्यांच्यावर केस केली होती. त्यांच्यावरच्या आरोपाचं गांभीर्य लक्षात घेता त्या दोघांनाही अटक होऊ शकली असती. आशिष यांना त्या वेळी जर्मनीला 'शोधनिबंध' सादर करायचा होता, त्याची ते तयारी करत होते. त्यांना अशा प्रकारच्या गोष्टींना धीरानं सामोरे जाण्याची सवय होती. तरीही ज्या दुष्टपणानं हा आरोप त्यांच्यावर केला गेला होता त्याचा त्यांना धक्का बसला.

आशिष यांनी कविताला सुचवलं, की या परिस्थितीत त्यांनी रुग्णांना घेऊन अमरावतीला जावं. पण त्यांनी त्याला नकार दिला. ''मी ठरल्याप्रमाणे हे शिबिर पार पाडणार. यांच्यावर ताबडतोब शस्त्रक्रिया केली नाही तर ते दृष्टी गमावून बसतील. या वृद्ध रुग्णांना हलवण्यात धोका आहे.'' त्यांनी डॉ. आशिषना सांगितलं.

त्यांचा देवावरचा दृढ विश्वास त्यांची ताकद आहे. त्यांची त्या वेळी सगळ्याला तोंड द्यायची तयारी होती. जर त्या दोघांना अटक झाली तर अथांगचे आजी-आजोबा त्याची काळजी घ्यायला तयार होते. ''कोणी तुझ्या आईवडिलांबद्दल वाईट बोललं तर त्यांना सांग, माझे आईवडील कायम खऱ्याच्या बाजूनं असतात.'' कविता यांनी त्यांच्या पाच वर्षांच्या मुलाला सांगितलं.

कविता यांची श्रद्धा आणि सत्याची बाजू यांचा विजय झाला. या केसचा तपास करणारे जे वरिष्ठ अधिकारी होते त्यांच्या तपासातून हे दोघं निर्दोष असल्याचं, त्यांनी कुठलेही अपशब्द वापरलेले नसल्याचं सिद्ध झालं.

आशिष यांचा गांधीजींच्या एका वचनावर पक्का विश्वास आहे. गांधीजी म्हणतात, ''सत्य अडचणीत येऊ शकतं, मात्र त्याचा कधीच पराभव होऊ शकत नाही.'' याच तत्त्वावर डॉक्टर सातव जगत आहेत आणि सत्यावरच्या या श्रद्धेनं त्यांना अनेक कठीण प्रसंगांतून पार पडायला मदत झाली आहे.

डॉ. आशिष आणि डॉ. कविता यांनी ज्या समाजाला आपलं मानलं, त्यांच्या वेदना, त्यांचं दुःख दूर करण्यासाठी ते आजही झटत आहेत. धारिणी येथील हॉस्पिटलशेजारी बांधलेल्या त्यांच्या घरात गेल्यावर त्यांचं साधं राहणीमान लक्षात येतं. घरातल्या हॉलमध्ये एक साधं टेबल आहे जे कामासाठी आणि जेवायला वापरलं जातं. दोघंही कामानिमित्त सतत बाहेर असतात. हॉस्पिटल आणि घर या दोन ठिकाणी त्यांचा वेळ विभागलेला असतो. घरातल्या स्वयंपाकघरात रुग्ण, भेट देणारे लोक आणि कर्मचारी यांच्यासाठी जेवण बनवण्याची गडबड चालू असते.

''आमचं कुटुंब ही आमची सर्वात मोठी ताकद आहे.'' डॉ. कविता सांगत होत्या, 'आम्ही जे करत असतो त्यात त्यांचा कायम पाठिंबा असतो आणि जेव्हा आम्हाला त्यांची मदत लागते तेव्हा ते आमच्यासाठी कायम हजर असतात.''

आशिष यांचे मोठे भाऊ आणि वहिनी हे दोघं आता मेळघाटला राहतात. डॉक्टरांना मदत व्हावी आणि तिथल्या काही गोष्टींची जबाबदारी घ्यावी या हेतूनं ते तिथं राहायला आले आहेत.

डॉ. आशिष आणि डॉ. कविता यांनी केलेल्या आणि अजूनही करत असलेल्या कामाची दखल देशानं आणि जगानंदेखील घेतली आहे. ''आठ वर्षांत सोळा गावातल्या पाच वर्षांच्या आतील मुलांचा मृत्युदर आम्ही ६३ टक्क्यांनी खाली आणला आहे.'' आशिष सांगत होते. आता स्थानिक प्रशासनानं त्यांच्याबरोबर संपूर्ण मेळघाट परिसरात काम करण्याचं ठरवलं आहे. आशिष यांनी तयार केलेल्या मॉडेलप्रमाणे बालकांच्या आरोग्याची काळजी घेण्याचा कार्यक्रम शासन राबवणार आहे. यात घरच्या घरीच

बालकांची काळजी घेण्यासाठी प्रशिक्षित स्वयंसेवक घरोघरी जाऊन योग्य पोषणमूल्य असणारा आहार बालकांना देतात.

कुपोषणाशी मुकाबला करून आरोग्याचे निर्देशांक सुधारता येतात आणि आदिवासी लोकांच्या आहारात बदल केल्यानं त्यांचं आरोग्य सुधारतं हे डॉ. आशिष यांच्या कामातून सिद्ध होतं. ऐंशीच्या घरात असलेल्या आजोबांच्या मदतीनं आशिष यांनी अर्ध्या एकरात पोषक आहार देणाऱ्या अन्नघटकांचे फार्म्स तयार केले. स्थानिक लोकांना तिथं हिरव्या भाज्या लावायला शिकवल्या. वसंतराव बोंबाटकर स्वतः मेळघाटला येऊन आदिवासींना शेतीचं प्रशिक्षण देतात.

अथांग आता त्याच्या आईवडिलांनी शिकवलेल्या मूल्यसंस्कारांची शिदोरी घेऊन मोठा झालाय. गरजूंसाठी तत्परतेनं काम करण्याची मानसिकता त्याच्या वृत्तीत रुजली आहे. ज्या शाळेत आदिवासी मुलं शिकतात त्याच मेळघाटमधील शाळेत त्याचंही शिक्षण झालंय. उपेक्षित लोकांसाठी तो अतिशय संवेदनशील आहे आणि त्यांना मदत करायला तो तत्पर असतो. एकदा तो त्याच्या आईवडिलांबरोबर अमरावतीला जाण्यासाठी वर्धा स्टेशनवर ट्रेनची वाट बघत होता. तो त्या वेळी नववीत होता. त्याच्या समोर एक मुलगा रेल्वे रुळाजवळच्या कचऱ्याच्या ढिगात काहीतरी वेचत असल्याचं त्याला दिसला. अथांग त्याच्याजवळ जाऊन त्याच्याशी बोलू लागला. ट्रेन येईपर्यंत तो त्याच्याशी बोलत बसला. तेवढ्या थोड्या वेळात त्यानं त्याच्याशी मैत्री केली.

अथांगनं त्याच्या आईवडिलांची बुद्धीही घेतली आहे. त्याची आई शिकली त्याच मेडिकल कॉलेजमधून तो आता मेडिसिनचं शिक्षण घेत आहे. मेळघाटमध्ये आणखी जास्त डॉक्टरांनी येऊन काम करण्याची गरज आहे असं डॉ. आशिष यांना वाटतं. त्यांची काळजी आता लवकरच मिटेल, कारण अथांग आता 'क्रिटिकल केअर' या विषयातला तज्ज्ञ डॉक्टर होत आहे.